**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.८६/२०२१**

**सरकार विरुध्द किसन सोमाजी आडे**

निशाणी क्र. १० लगत

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ याची शपथेवर साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक शपथेवर निवेदन करतो की,

माझे नाव — अजय बोनेश गुरनुले

वय– ४१ वर्षे, धंदा – पोलीस हवालदार ब.न. ७८४

राहणार — सध्या नेमणूक अंगुलीमुद्रा विभाग, पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

**<u>सरतपास अभियोग पक्षाकरिता सहा.सरकारी अभियोक्ता कु. माधुरी जोगे यांच्यामार्फत –</u>**

१. आरोपीस मी ओळखतो. दिनांक १४.०३.२०२१ रोजी मी उमरी पोतदार पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर नेमणूकीस होतो. त्या दिवशी मी व इतर कर्मचारी पोलीस स्टेशनला हजर असताना आम्हाला गुप्त बातमी मिळाली की, मौजा डोंगरहळदी येथे आरोपी हा त्याच्या घरात देशी बाळगुन तिची विक्री करीत आहे. या माहितीवरुन आम्ही डोंगरहळदी येथे गेलो. तिथे दोन पंचांना बोलावून त्यांना सूचनापत्र दिले. ते आता मला दाखविण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी व पंचांच्या सह्या आहेत. ते नि.क्र. १२ वर आहे. त्यानंतर त्यांना सोबत आरोपीच्या घरी गेलो. तिथे एक इसम घराबाहेर आला. त्याला त्याचये नाव गाव विचारले असता त्याने किसन सोमा आडे असे सांगितले. त्याला आम्ही आमचा परिचय देवून घरी येण्याचे कारण सांगून आपापली झडती दिली. त्यानंतर पंचासमक्ष आरोपीच्या घराची झडती घेतली असता त्याच्या घराच्या पहिल्या खोलीत टिनाच्या कोठीमध्ये प्रत्येकी ९० मि.ली.च्या देशी दारु संत्राच्या १५० बाटल्या मिळुन आल्या. त्या मी जप्त करुन घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. तो आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर बरोबर व खरा असुन त्यावर माझी व पंचांच्या सह्या आहेत. तो **नि.क्र. १३** वर आहेत. त्यानंतर मी त्यापैकी एक बाटली रासायनिक तपासणीकामी वेगळी काढुन त्यावर पंचांचे सह्याचे सिल लावले. त्यावेळी मी सि.ए.फार्म भरला होता. तो आता मला

दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. १५** देण्यात येतो.

२. त्यानंतर आरोपी व मुद्देमाल घेवून आम्ही पोलीस ठाण्यात आलो. तिथे मी आरोपीविरुध्द फिर्याद दिली. ती आता मला दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १६** देण्यात येतो. त्यावरुन नोंदविण्यात आलेला प्रथम खबरी अहवाल आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. १७** देण्यात येतो. झडतीच्यावेळी मी आरोपीच्या घराचे विद्युत बील जप्त केले होते. ते आता मला दाखविण्यात आले. ते तेच असून त्यास **वस्तू अ** देण्यात येतो. जप्त मुद्देमाल मुद्देमाल मोहररकडे जमा करुन मुद्देमाल पावती घेतली. ती तीच असून त्यावर मुद्देमाल मोहरर यांची सही आहे व दाखल करणार म्हणून माझे नाव लिहिले आहे. त्यास **नि.क्र. १८** देण्यात येतो. आजरोजी तो न्यायालयात हजर नसून त्याचा हजेरी माफीचा अर्ज **नि.क्र. १४** वर आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. के. बी. पाल यांच्यावतीने ॲड आर्या क्रिष्णा यांच्यामार्फत–**

३. हे म्हणणे खरे नाही की, मी एकाच पंचाला सूचनापत्र दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सूचनापत्रावर पंचनाम्यासाठी हजर राहण्याची वेळ नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकूर खोटा आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2024.01.19 16:54:44 +0530

(स.दि.कमलाकर)

दिनांक– १९.०१.२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पोंभुर्णा.